अनुयायांचा सवाल !.. कलंकाचे काय ?

निमित्त

डॉ.जी.के. डोंगरगावकर

भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास सर्व जगाला ज्ञात आहे. १५ ऑगस्ट १९४७ भारत देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताच्या तीन वाटण्या होणार होत्या. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आणि ब्रिटीश सरकार यामध्ये त्रिपक्षीय करार झाला. त्या कराराचे अनेक मुद्दे होते त्यापैकी अस्पृश्यतेचा कलंक स्वतंत्र भारतात पुसला जाणार ही एक त्रिपक्षीय करारातील अट होती. हिंदूंच्यावतीने स्वतंत्र भारताच्या चळवळीचे पुढारी महात्मा गांधी आणि अस्पृश्यांच्यावतीने मानवी स्वातंत्र्याच्या चळवळीचे युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांमध्ये करार झाला. स्वतंत्र भारतात बॅरिस्टर जीना यांनी आपण या देशात राहणार नाही, आपणास स्वतंत्र पाकिस्तान आवश्यक आहे, अशी अट लादली ती मान्य झाली आणि स्वतंत्र पाकिस्तान निर्माण झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र दलित स्थानाची मागणी केल्याचे त्यांच्या समग्र साहित्यामध्ये कोठे दिसत नाही. मात्र स्वातंत्र्यामध्ये हजारो वर्षांपासून गुलामीचे जीवन जगणाऱ्या अस्पृश्यांच्या हक्काचे काय होणार याविषयी त्यांनी चिंता वेळोवेळी आपल्या कार्यकर्त्यांच्या पुढे त्यांची भाषणे आणि लेखन यामध्ये केल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्यावतीने गोलमेज परिषदेमध्ये आपले भाषण करून जातीनिवाडा मंजूर करून घेतला. पुढे या जाती निवाड्याचे रूपांतर पुणे करारामध्ये आणि पुणे कराराचा भाग म्हणून अस्पृश्यता पाळणे हा कलंक असून तो फौजदारी स्वरूपाचा गुन्हा हे भारतीय संविधानाने मान्य केले. २६ नोव्हेंबर १९४९ मध्ये स्वीकारलेल्या भारतीय राज्यघटनेने अस्पृश्यता पाळणे गुन्हा असल्याचे संविधानातील तरतुदीला मान्यता देण्यात आली. संविधान सभेत या तरतुदीवर प्रचंड खल झाला, चर्चा झाली आणि चर्चेअंती कलम १७ नुसार अस्पृश्यता पाळणे कलंकच नव्हे तर तो गुन्हा आहे. अस्पृश्यतेच्या कारणावरूनच आताच्या अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, विधिमंडळ आणि लोकसभा या शासन करणाऱ्या संविधानिक यंत्रणेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती म्हणजेच पूर्वाश्रमीत अस्पृश्यांसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकप्रतिनिधी निवडण्याची तरतूद संविधानात करण्यात आली. त्यानुसार १९५२ ते २०१४ या कालखंडामध्ये अनेकवेळा विधिमंडळाच्या आणि लोकसभेच्या निवडणुका झाल्या. भारत सरकारच्या निवडणूक आयोगाने निवडणुका घेतल्या. गुप्त मतदान पद्धतीने निवडणुकीला उमेदवार सामोरे गेले. लोकशाही पद्धतीने उमेदवार राखीव जागेवर त्या-त्या संवर्गातले निवडून आले. मात्र या सभागृहामध्ये अस्पृश्यतेच्या कलंकाने ग्रस्त झालेले भयभीत लोकांचे प्रश्न सभागृहामध्ये किती चर्चिले गेले आणि ते किती प्रमाणात सुटले हे एक मोठे गौडबंगाल आणि कोडं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी त्यांच्या अनुयायांना पडले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन काँग्रेस, भाजपा, कम्युनिस्ट पक्ष, सपा हे पक्ष करीत असून त्यांच्या विचार आणि सिद्धांताचे प्रतिबिंब यांच्या शासनाच्या ध्येयधोरण कार्यक्रम यामध्ये प्रतिबिंबित असल्याचे शतप्रतिशत दिसून येत नाही. ज्या काँग्रेस पक्षांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विरोधामध्ये १९५२ आणि १९५४ मध्ये झालेल्या मुंबई आणि भंडारा या लोकसभा मतदारसंघात उमेदवार उभे केले तो काँग्रेस पक्ष आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन का करीत आहे? याचं कोडं २५ ते ३५ वर्षे वयोगटातील तरुणांना नव्हे तर पन्नाशी ओलांडलेल्या काँग्रेसमधील कार्यकर्त्यांनासुद्धा पडलेले आहे. काँग्रेसची विचारधारा बदललेली आहे की, आंबेडकरी विचाराच्या मतदारांची फसवणूक आहे याचे प्रतिपादन एकदा काँग्रेसने आपल्या वर्तनातूनच सिद्ध करण्याची आवश्यकता आहे. अस्पृश्यतेचा कलंक या प्रदेशातसुद्धा शतप्रतिशत पुसला नाही. काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रामध्ये १९६० पासून ४० वर्षे एकहाती सत्ता भोगली. फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव पदोपदी जपून केले. मात्र अस्पृश्यता आजसुद्धा महाराष्ट्रामध्ये गावोगावी दिसून येते. भाजपने गुजरातमध्ये १५ वर्षे मोदींच्या नेतृत्वाखाली शासन चालविले. सध्या नरेंद्र मोदींकडे विवेकानंदाचे पटशिष्य म्हणून लोक त्यांच्याकडे पाहतात. त्या गुजरात राज्यामध्ये आजसुद्धा अनुसूचित जातीच्या आणि अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेमध्ये सरकारतर्फे दिला जाणारा मध्यान्ह भोजनसुद्धा वेगळ्या पंक्तीत बसून दिले जाते. अस्पृश्यतेचा अनुभव देशाच्या सर्व कानाकोपऱ्यामध्ये गावोगावी कोणत्याकोणत्या स्वरूपामध्ये असल्याचे अनुसूचित जाती-जमाती आयोगानी भारताचे पंतप्रधान नेहरूंपासून मोदींपर्यंतच्या सर्व पंतप्रधानांना दस्तावेजाच्या माध्यमातून कळविले आहे. १९५२ ते १९९० या काळामधील लोकसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागेवर काँग्रेसचे प्रतिनिधी निवडून येत असत. आता २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या ८४ जागेपैकी ४० जागा भाजपच्या उमेदवारांनी जिंकल्या आणि भाजपच्या मित्रपक्षांनी ०९ जागा जिंकल्या. अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या लोकसभेतील एकूण ४७ जागेपैकी २६ जागा भाजपने जिंकल्या. राखीव जागेवर परंपरेने काँग्रेस पक्षाची पकड होती ती आता जागा भाजपने घेतली आहे. उत्तर प्रदेशात अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या १७ लोकसभा मतदारसंघापैकी सर्व मतदारसंघ भाजपने २०१४ साली जिंकले. मायावतीच्या बहुजन समाज पक्षाला आणि मुलायमसिंगांच्या समाजवादी पक्षाला यापैकी एकाही मतदारसंघात विजय मिळविता आला नाही.

राज्यसभेत अनुसूचित जाती-जमातीसाठी आरक्षण नाही तरीही भाजपने राज्यसभेत पाच जागेवर अनुसूचित जातीचे उमेदवार विजयी केले आहेत. त्यात महाराष्ट्रातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) चे नेतृत्व करणारे रामदास आठवले आहेत. १९५२ ते २०१४ या कालखंडामधील राखीव जागेवर निवडून आलेल्या उमेदवाराचा अभ्यास केला असता खऱ्या अर्थाने अनुसूचित जातीच्या-जमातीच्या म्हणजेच पूर्वाश्रमीत अस्पृश्यांच्या कल्याणासाठी अथवा संविधानिक हक्कासाठी लढलेल्या, संघर्ष केलेल्या चळवळीतील कार्यकर्त्याला लोकप्रतिनिधी म्हणून जाण्याची संधीच मिळत नसेल तर आंबेडकर चळवळीमध्ये का काम करावे? असा एक नवा सूर अनुसूचित जाती-जमातीच्या नवतरुणांमध्ये निर्माण झाला आहे. आरक्षणाच्या कोट्यातून मोक्याच्या जागा बळकावलेल्या अधिकाऱ्यांची मुले धनाच्या बळावर भाजप आणि काँग्रेस पक्षाची चोचलीगिरी आणि हुजरेगिरी करून राखीव जागेवर प्रतिनिधीत्व होण्यासाठी मोठी धडपड सुरू झाली आहे. मग सांगा स्वातंत्र्यामध्ये पूर्वाश्रमीत अस्पृश्यांना दिलेल्या वचनाचे महात्मा गांधींचे लोक काय करणार आहेत. महात्मा गांधीच्या विचाराला सन्मानीत करणारे मनमोहन सिंग आणि आताचे भाजपचे नरेंद्र मोदी अस्पृश्यतेचा कलंक पुसून काढण्यास ६८ वर्षांनंतर काही नवीन डावपेच निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून आखणार आहेत की, सबका साथ, सबका विकास म्हणण्यामध्ये पूर्वाश्रमीत अस्पृश्यांच्या भावनेला हात घालून त्यांना कळपात ठेवणार आहेत हेच खरे आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांपुढे आहे. संधीसाधू राजकारण आणि त्यातून सत्ता यासाठी कुमारी बहन मायावती यांनी भाजपशी युती करून सत्तेची भाजपप्रणित पायवाट सुरू झाली. रामविलास पासवान यांनी पूर्व भारतातून या वाटेचे सहप्रवासी होऊन द्रुतगती मार्ग चालू उभारायचा? का परंपरागत हजारो वर्षांपासूनच्या अस्पृश्यतेच्या माध्यमातून लादलेली व्यवस्था निमूटपणे स्वीकारायची याचे पुन्हा पुन्हा चिंतन करून भविष्यकाळामध्ये एकसंघ आंबेडकरी विचाराची शपथ घेतलेले तरुण एकत्र येऊन अस्पृश्याचे कलंक पुसून काढणारे सत्तेच्या परिघात जाणारे आंदोलन उभे करण्याची आवश्यकता आजच्या घडीला आहे. आणि हे आव्हान पेलवण्याची सद्भावना तमाम आंबेडकर अनुयायांना येवो हीच प्रतिज्ञा महापरिनिर्वाण दिनी सर्वांना! अस्पृश्यतेचा कलंक गांधींचे लोक आणि मोदींचे लोक पुसून काढण्यात पुढाकार घेतला पाहिजे. अस्पृश्यतेने देशाचे प्रचंड वाटोळे होत आहे.

महाशक्तीशाली भारत एक भारत आणि श्रेष्ठ भारत होण्यामधली ही एक मोठी अडचण आहे. म्हणूनच भगवान बुद्धाने अस्पृश्यतेचा निषेध केला आणि भवतु सब्ब मंगलम् हा संदेश भारत भूमीत राबविला. म्हणून आंबेडकर विरोधी चळवळीमध्ये तथा संघटनेमध्ये काम करणाऱ्या तमाम आंबेडकरवाद्यांनी त्या संघटनेला रामराम करून एकसंघ आंबेडकरी चळवळी उभ्या करण्याची प्रतिज्ञा करावी एवढीच विनंती या प्रसंगी अन्यथा अस्पृश्यतेचा हजारो वर्षांपासूनचा कलंक पुढच्या हजारो वर्ष राहणार नाही याची काय खात्री? गाव त्या गावातील स्मशानभूमी सर्वांसाठी खुली आहे काय? एक गाव त्या गावातील मंदिर सर्वांसाठी खुले आहे काय? एक गाव त्या गावातील विना अनुदानित इंग्रजी शाळा सर्वांसाठी खुली आहे काय? एक गाव त्या गावातील शुद्ध पाणी सर्वांना पिण्यासाठी मिळते काय? आणि त्याचे उत्तर आहे नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची प्रतारणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी आणि त्याचे विरोधक करीत असतील तर त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक दास्य आणि गुलामगिरीच्या विरोधामध्ये लढा कोणी उभारायचा? का परंपरागत हजारो वर्षांपासूनची अस्पृश्यतेच्या माध्यमातून लादलेली व्यवस्था निमूटपणे स्वीकारायची याचे पुन्हा पुन्हा चिंतन करून भविष्यकाळामध्ये एकसंघ आंबेडकरी विचाराची शपथ घेतलेले तरुण एकत्र येऊन अस्पृश्याचे कलंक पुसून काढणारे सत्तेच्या परिघात जाणारे आंदोलन उभे करण्याची आवश्यकता आजच्या घडीला आहे. आणि हे आव्हान पेलवण्याची सद्भावना तमाम आंबेडकर अनुयायांना येवो हीच प्रतिज्ञा महापरिनिर्वाणदिनी सर्वांना!

राष्ट्रीय युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर

निमित्त

गे.ना. परदेशी

थोडक्यात महत्त्वाचा अस्पृश्योधारक, दीनदुबळ्यांचे कैवारी, भारतरत्न, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, समाजसुधारक सामाजिक कनवाळू, महान राजकीय नेते, तत्त्वचिंतक असे डॉ. आंबेडकर होते. भीमराव रामजी आंबेडकर हे पूर्ण नाव पण त्यांच्या अस्पृश्योद्धारक क्रांतीकार्यामुळे समाज जनता त्यांना 'बाबासाहेब' ह्या आदरार्थी नावाने ओळखत असत.

आपल्या कुटुंबातील लहानांचे 'बाबा.' तळमळीच्या चौफेर आणि सर्वांगीण कार्यामुळे 'बाबासाहेब' नावाने लोकप्रिय झाले. ६ डिसेंबर २०१५ रोजी त्यांच्या ५९ वा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त लिहिलेला हा प्रासंगिक आत्मचरित्रात्मक लेख होय.

जन्म, बालपण, शिक्षण :- बाबासाहेबांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला. विद्वान पुरुषांची कर्मभूमी म्हणून लोकप्रिय असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील 'महू' गावी झाला. तत्कालीन काळाच्या गरजेप्रमाणे ते उदयास आले. त्यांचे बालपण संस्कारमय वातावरणात घडले. बालपणी मातेचे छत्र हरपले. म्हणून 'मीराबाई' या आत्याने त्यांना मातेप्रमाणे वाढविले. अस्पृश्याचे चटके, फटके सोशित धैर्याने, चिकाटीने ते शिकले. परिस्थिती रडवते, अडवते आणि घडवते. हालअपेष्टा सोसून ते शिकले. एम्.ए. पीएच्.डी., एम्.एस्.सी. आणि कायद्याचे बॅरिस्टर झाले. एकापाठोपाठ पदव्यांचे अवघड किल्ले सर केले. कर्तृत्वाचे ध्वजच उंच फडकवले. विद्वान पंडितांना लाजवते.

सुविचार धन :- बाबासाहेबांचे विचार हे सुविचारच होते. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून सर्वसामान्य जनतेच्या सुखासाठी आहे. सरकारी नोकरी किंवा वकिली व्यवसायात मन न होता समाजावरील अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, धर्मातील जाचक रुढी झुगारुन दलितांसाठी एकजुटीने लढा घ्यावा. दलितावरील अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी 'मूकनायक' नावाचे पाक्षिक सुरु केले. दिनांचे दारिद्र्य अपमानास्पद जिणे दूर करण्यासाठी बहिष्कृत हितकारणी सभा स्थापन केली. शिका, संघटित व्हा, शिकवा, चेतवा ही ब्रीद वाक्ये 'बहिष्कृत भारत' साप्ताहिकात छापली. समाजाचा स्वाभिमान जागृत केला. १९२७ च्या मे महिन्यात अस्पृश्यांना प्रवेशबंदी असलेला महाड येथील चवदार तळा सत्याग्रह करून खुला केला. मंदिर प्रवेश बंदी उठवली. 'सबके लिए खुला है' मंदिर यह हमारा देशी, विदेशियोंका मंदिर है हमारा हे, तुकडोजी महाराजांचे दिल लोकप्रिय करुन जागृती केली. सरकारी नोकऱ्यांमध्ये अस्पृश्यांना राखीव जागा असाव्यात, ह्यासाठी विभक्त मतदारसंघाचा आग्रह धरला. स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेचे बहुमोल कार्य केले. स्वतः अध्यक्ष होते. १९५६ साली आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. अशाप्रकारे बाबासाहेबांनी अस्पृश्यांना समाजात मोलाचे स्थान मिळवून दिले. बाबासाहेब त्यांच्या चिरस्मृतीनिमित्त आंबेडकर वाचनालय, डॉ. आंबेडकर महाविद्यालय, डॉ. आंबेडकर मार्ग आहेत. त्यांचे पुतळे भव्य स्वरुपात आहेत. त्यांच्या कार्याचा आदेश बाळगणे हीच त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

सामाजिक बहिष्कार कायद्याचा गैरवापर होण्याची भीती

। रोहा । जितेंद्र जोशी ।

महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंध अधिनियम २०१५ पारित करण्यासंदर्भात शासन पातळीवर हालचाली सुरू आहेत. सामाजिक बहिष्काराच्या घटनांकडे पाहिले असता यातील काही प्रकरणांमध्ये तथ्य असले तरी अनेक प्रकरणे राजकीय हेतूने किंवा स्वतःच्या स्वार्थासाठी मुद्दाम पुढे आणली जात आहेत.पाचामुखी परमेश्वर या उक्तीनुसार गाव पंच किंवा गावकी पद्धत अस्तित्वात आली आहेत.राज्याचे माजी गृहमंत्री आर.आर.पाटील यांच्या संकल्पनेतून म.गांधी तंटामुक्त गाव योजना राज्य शासनाकडून चालू करण्यात आली. तंटामुक्त अध्यक्ष किंवा कमिटी सदस्य यांच्याकडून देखील गैरप्रकार होत असल्याच्या घटना यापूर्वी निदर्शनास आल्या आहेत.तरी देखील सदर योजना अद्याप सुरूच आहे. गावाचा कारभार करताना केवळ न्यायनिवाडा इतकेच गाव पंचायतीचे किंवा जात पंचायतीचे काम नसते.गावातील अथवा समाजातील सण, उत्सव, यात्रा, धार्मिक परंपरा, चालीरिती, रूढी-परंपरा यांची जपणूक करणे हे देखील या मंडळींचे कर्तव्य असते. गावातील रस्ते, गटारे, सार्वजनिक वास्तू, बांधबंदिस्ती, लग्नकार्य, मयत कार्य यामध्ये गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता गावपंचाकडून सामूहिक जबाबदारीने सर्व कामे पार पाडली जात असल्याचे चित्र आहे. गावातील ५००-१००० लोकसंख्येपैकी २-५ टक्के मंडळी काही रूढी-परंपरा अथवा सार्वजनिक कामात विरोध करत असल्यास गाव पंचांकडून त्यांना शासन देखील केले जात होते.सर्वसामान्य जनतेला लहान-सहान गोष्टीवरून कोर्ट-कचेऱ्या करण्यास लागू नयेत हाच यामागील उद्देश होता.परंतु काही मंडळींच्या अतिरेकी कारभारामुळे गाव पंचायत तसेच जात पंचायती मोडून काढल्या जात आहेत. राज्यासह रायगड जिल्ह्यात देखील सामाजिक बहिष्कृतेची अनेक प्रकरणे समोर आल्याने राज्यशासन यासाठी कायदा करण्याबाबत गंभीर आहे. परंतु सामाजिक बहिष्कार कायद्याचा गैरवापर होण्याची देखील भीती असल्याचे काही प्रकरणात दिसून येत आहे.

रोहा तालुक्यातील कराडी समाजाच्या डोंगरी गावातील १४ कुटुंबांचे वाळीत प्रकरण काही महिन्यांपूर्वी मोठ्या प्रमाणात चर्चेला आले होते. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांनंतर या मंडळींनी आम्हाला गावाने बहिष्कृत केले असल्याची ओरड सुरू केली आहे.

फेब्रुवारी २०१५ मध्ये रोहा उपविभागीय अधिकारी तसेच पोलीस प्रशासन आणि जिल्ह्यातील विविध पत्रकार यांच्या समक्ष या गावामध्ये सलोखा करण्यात आला होता. परंतु स्थानिक प्रशासन आपल्यावर अन्याय करत असल्याचे १४ कुटुंबांचे म्हणणे समोर आल्याने या गावात जाऊन आढावा घेतला असता अनेक गोष्टी समोर आल्या आहेत. फेब्रुवारी २०१५ मध्ये सलोखा करण्यात आला. त्यावेळी २१ कुटुंबे गावातील दैनंदिन व्यवहारांपासून अलिप्त होती. आजच्या घडीला केवळ १४ कुटुंबे आम्हाला वाळीत टाकल्याचे सांगत आहेत. याबाबत गावकीचे अध्यक्ष तथा राजकीय नेतृत्व असणारे गणेश मढवी यांची भेट घेतली असता आम्ही गावातील कोणालाही वाळीत टाकलेले नसून गावातील शाळा, पाणवठे, मंदिर, रस्ता तसेच सर्व ठिकाणी जाण्यास गावातील कोणालाही मज्जाव नसल्याचे सांगितले. १४ कुटुंबांबाबत विचारणा केली असता यातील अनिल लखमा शिंदे यांचे कुटुंबिय अलिबाग येथे तर संतोष नामदेव झावरे यांचे वास्तव्य त्यांच्या कुटुंबासह वरसे येथे असल्याचे सांगितले. गावातील सत्यवान मढवी, यशवंत पांडुरंग झावरे, गजानन तुकाराम मढवी यांना त्यांच्या मुलांच्या लग्नकार्यात आपण स्वतः वैयक्तिक मदत केली असल्याचे सांगितले.

नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये विरोधी गटाचा दारुण पराभव झाल्याने वैफल्यग्रस्त होऊन सदर मंडळी बेछूट आरोप करत असल्याचे गणेश मढवी यांनी सांगितले आहे. या निवडणुकीत विरोधकांना कमीतकमी १२३ तर जास्तीत जास्त १३७ मतदान झालेले आहे.२०१३ साली या १४ कुटुंबांनी आम्हाला वेगळ्या गावाचा दर्जा द्यावा, अशी समाजाच्या जिल्हा कमिटीकडे मागणी केली होती.जिल्हा कमिटीने रामराज, उमटे व रेवदंडा येथे बैठका घेऊन डोंगरी गावातील दोन्ही गटांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता. मात्र हे प्रयत्न अयशस्वी झाल्याने जिल्हा कमिटीने त्यांना डोंगरी गावातील वेगळा गट म्हणून कोकवन येथील सभेत मान्यता दिली आहे. गावात काळकाई देवीचे मंदिरच नाही. यामुळे देवीच्या डोक्यावर हात ठेवून शपथ घेण्यास सांगण्याचा प्रश्नच येत नाही असे गणेश मढवी यांनी सांगितले. हेमंत शिंदे यांच्या पत्नी मंजुळा शिंदे, सुजाता शिंदे व अविनाश भगत नुकत्याच झालेल्या ग्रा.पं.निवडणुकांमध्ये पराभूत झाले आहेत. मागील २५ वर्षांपासून मी राजकारणात कार्यरत असून समाजात तसेच ग्रामपंचायतीमध्ये विविध पदे यशस्वीरित्या सांभाळलेली आहेत. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड बाजार या संस्थांमध्ये मी संचालक असून वावेपोटगे वि.वि. का. सोसायटीचा चेअरमन आहे. माझ्यावरील आकसापोटी मला व गावाला बदनाम करण्याचे षडयंत्र गावातील काही मंडळींनी चालविले असल्याने लवकरच या मंडळीविरोधात एक कोटीचा अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार असल्याचे मढवी यांनी सांगितले.

डोंगरी गावातील विरोधी कुटुंबाकडून आम्हाला त्रास होत असल्याची तसेच स्थानिक प्रशासन,पोलीस यंत्रणा यांच्याकडून सहकार्य होत नसल्याची आरडाओरड केली जात आहे. मीडियाच्या माध्यमातून प्रशासन व पोलीस यंत्रणा यांच्यावर दबाव आणला जात आहे. महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंध कायदा पारित करताना दोन्ही बाजूंचे म्हणणे पूर्णतः ऐकून तालुकास्तरीय वाळीत प्रकरण निर्मूलन समितीमार्फत शहानिशा करून त्यांचा अहवाल आल्यानंतरच गुन्हे दाखल करण्याची तरतूद असावी, अशी मागणी गणेश मढवी यांनी केली आहे. याबाबत रोहा पोलीस निरीक्षक संजय धुमाळ यांच्याशी संपर्क साधला असता या प्रकरणातील दोन्ही गटांशी यापूर्वी गावात व प्रांत कार्यालयात सभा घेण्यात आल्या असल्याचे सांगितले.

याबाबत कोणाचीही तक्रार आल्यास पूर्ण चौकशीअंती दोषींच्या विरोधात योग्य ती कारवाई केली जाईल, असे सांगितले.

बळवंत वालेकर यांचे जिल्हा परिषदेतर्फे अभिनंदन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

'कुलाबा वैभव' संपादक बळवंत वालेकर यांची अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबाबत रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण व क्रीडा समितीने ठराव क्रमांक ६२४ अन्वये वालेकर यांचे अभिनंदन केले. या सभेच्या अध्यक्षस्थानी शिक्षण, आरोग्य व क्रीडा समितीचे सभापती भाईसाहेब पाशिलकर होते. रायगड जिल्हा परिषदेने जा.क्र.राजिप/शिक्षण/आ-१८/६९१६, दि. १६/११/२०१५ नुसार बळवंत वालेकर यांना पत्राद्वारे कळविले आहे.'कुलाबा वैभव' संपादक बळवंत वालेकर पत्रकारितेत ३६ वर्षे असून अनेक सामाजिक कामे केली आहेत. वनविभागात वसलेल्या माची-सागरगड येथील आदिवासींना रस्ता, वीज, पाणी व आरोग्यविषयक सुविधा मिळण्यासाठी ते तब्बल २१ वर्षे झगडले. त्यामुळे या वाडीस भौतिक सुविधांसाठी १० एकर जागा वन विभागाकडून मिळविण्यात ते यशस्वी झाले. त्याबाबत रायगड जिल्हा परिषदेने 'रायगड भूषण' व रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाने रायगड पत्रभूषण पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले. अलिबाग तालुका शिक्षण प्रसारक मंडळ ही पारतंत्र्य काळात स्थापन झालेली शिक्षण संस्था असून या संस्थेच्या ९ प्राथमिक शाळा आहेत.

'ज्ञानकण'

- जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज

पंढरीत विज्ञानाची दिंडी

जेव्हा संत तुकाराम महाराज यांची कीर्तने गाजू लागली. त्यांची कीर्ती दूरवर पसरु लागली. विद्वान मंडळीसुद्धा तुकोबारायांची कीर्तने ऐकायला गर्दी करुन लागली. त्याच काळात तुकोबारायांच्या देहू गावात मंबाजीबुवा नावाचे विद्वान व्यासंगी ब्राह्मण रहात होते. त्यांनीही शास्त्राभ्यास केलेला होता. तेही कीर्तन करीत असत; पण जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या रसाळ व बोधप्रत कवित्वामुळे मंबाजीबुवांच्या कीर्तनातील गर्दी कमी होऊ लागली. त्यांच्या मनाचा ताबा मत्सराने घेतला. तुकारामबुवांवर सूड उगविण्याची संधी मंबाजीबुवा शोधू लागले. एकदा तुकाराम महाराजांची म्हैस मंबाजीबुवाच्या बागेत शिरली तिने बागेचे बरेचसे नुकसान केले. मंबाजीला ते कळल्यावर बोलावून बागेची नासधूस आणि म्हैशीचे दयनीय अवस्था दाखविली. तुकाराम महाराजांना शिवीगाळ केली. त्याला वाटले की तुकारामबुवा जाब विचारतील. परंतु तुकोबारायांनी तसे काहीही केले नाही. उलट शांतपणे सर्व दूषणे सहन करुन म्हशीला घेऊन गेले जाताना मंबाजीबुवांची केली. खरा कीर्तनकार व नाटकी कीर्तनकार कोण हे आता तुम्हाला नीट कळेल. गंमत अशी की, या मंबाजीबुवांनी लोकांना अहिंसेचे उपदेश त्यांच्या कीर्तनातून अनेकवेळा केले असतील, पण त्याच कीर्तनकाराने केले काय? तर म्हैशीसारख्या मुक्या प्राण्याला बडव बडव बडविले, तुकारामबुवांसारख्या विठ्ठल भक्तास शिव्याशाप दिले. कुठे गेली भूतदया, कुठे लोप पावली सद्भावना व सहिष्णुता? कीर्तनकाराच्या अंगी हे गुण नसतील तर तो बेगडी कीर्तनकारच समजावा! एवढे करुनही मंबाजीबुवांचा सूडाग्नी शमला नव्हता. त्याने तुकाराम महाराजांच्या नेहमीच्या जाण्या-येण्याच्या वाटेवर निवडुंगाचे काटेरी कुंपण घातले ती वाटच बंद करुन टाकली. दुसऱ्या दिवशी तुकाराम महाराज त्या वाटेने आले. वाट बंद पाहून त्यांनी काही निवडुंग व काटेरी फांद्या काढून वाट मोकळी केली. त्यांच्यावर पाळत ठेवून असलेला मंबाजीबुवा रागाने तणतणत तेथे आला व त्याच काटेरी निवडुंगांनी तुकाराम महाराजांना झोडपून काढले. तोंडातून अवाक्षरही न काढता तुकोबारायांनी तो असह्य मार सहन केला. त्यांना मारुन मारुन मंबाजीबुवा थकला, धापा टाकू लागला. त्याने तुकाराम महाराजांना सोडून दिले. तुकोबाराय पांडुरंगाच्या देवळात गेले व त्याला आपले दुःख सांगितले. हा प्रकार तुकाराम महाराजांच्या पत्नी आवडीला कळला. तिने देवळाकडे धाव घेतली. तुकोबारायांचे रक्तबंबाळ झालेले शरीर पाहून तिथे थेट देवालाच शिव्या शाप दिले व मग मंबाजीबुवांच्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार केला. तुकोबारायांच्या पाठीत घुसलेले काटे हळुवारपणे काढले. त्यांच्या दुखऱ्या अंगाला तेल हळुवारपणे चोळले.

- क्रमशः

पोयनाड मार्गाच्या दुर्दशेस ओव्हरलोड वाहतूक जबाबदार

खड्डेमय मार्गाने वाहनांत बिघाड झाल्याने प्रवासी जनतेचे अतोनात हाल

। पाली । बेणसे । वार्ताहर ।

शिहू-नागोठणे- पोयनाड मार्गावरुन सतत होणारी अवजड व ओव्हरलोड वाहतूक यामुळे रस्ताफुटी होऊन मार्गाची प्रचंड दुर्दशा झाली आहे. (छायाचित्र : धम्मशील सावंत)

शिहू-नागोठणे-पोयनाड हा मार्ग वाहतुकीच्या व प्रवासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व सोयीचा मार्ग असून सद्यस्थितीत हा मार्ग जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे जीवघेणा व धोकादायक बनला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे. या मार्गावरुन सातत्याने होणारी ओव्हरलोड व अवजड वाहतूक या मार्गाच्या दुर्दशेला जबाबदार असल्याने जनतेतून अशा वाहतुकीबाबत प्रचंड संताप व्यक्त होत आहे. शिहू नागोठणे पोयनाड मार्गाच्या दुर्दशेमुळे जीवघेण्या अपघातात वाढ देखील झाली आहे तर प्रवासी, वाहनचालक यांची हाडे खिळखिळी होण्याबरोबरच वाहनांमध्येदेखील बिघाड होण्याचे प्रमाण वाढले आहे. जगातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रिलायन्स नागोठणे कंपनीसारखा बडा प्रकल्प या मार्गालगत असून कंपनीत येणारे जाणारे मोठमोठे गॅस टँकर, डंपर, ट्रेलर, कंटेनर, टेम्पो आदींसारखे अवजड व ओव्हरलोड वाहने यामुळे रस्ता फुटी होत असल्याचा आरोप स्थानिक जनतेतून होत आहे तर रिलायन्स नागोठणे कंपनी, सन पेट्रो कंपनी यांनी सामाजिक बांधिलकीची जपणूक करीत पुढाकार घेऊन शिहू नागोठणे मार्गाचे डांबरीकरण करावे, अशी अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांनी देखील या जीवघेण्या खडतर मार्गाच्या डांबरीकरण व मजबुतीकरणाकरिता भरघोस निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करावेत व शिहू नागोठणे पोयनाड मार्ग प्रवास करण्याच्या लायक करावा, अशी मागणी होत आहे. शिहू-नागोठणे-पोयनाड या मार्गाची सद्यस्थितीत भयावह दुर्दशा झाल्याचे दिसत आहे. या मार्गावरील धारदार दगडगोटे, मोठमोठे खड्डे, खडी आदींमुळे हा मार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे. या मार्गाचे काम हे निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप देखील प्रवासी जनता करताना दिसत आहेत. मृत्यूच्या जबड्यातून प्रवास करताना अक्षरशा कमरेची व मान मणक्याची हाडे खिळखिळी होत असल्याने जनतेतून अत्यंत संतप्त भावना उमटताना दिसत आहेत.

अझीम प्रेमजी विद्यापीठाचे तीन अभिनव शिक्षणक्रम

एम. ए.इन. एज्युकेशन, डेव्हलपमेंट आणि पब्लिक पॉलिसी व गव्हर्नंस'

। पुणे । वृत्तसंस्था ।

अझीम प्रेमजी विद्यापीठाने मास्टर्स ऑफ आर्टस (एम.ए.) इन एज्युकेशन, मास्टर्स ऑफ आर्टस (एम.ए.) इन डेव्हलपमेंट आणि मास्टर्स ऑफ आर्टस (एम.ए.) इन पब्लिक पॉलिसी ॲण्ड गव्हर्नन्स हे दोन वर्षांच्या कालावधीचे लक्षणीय पदव्युत्तर निवासी शिक्षणक्रम सुरु केले असून, २०१६-१०१८ या वर्षांच्या तुकडीसाठी वरील शिक्षणक्रमांसाठी प्रवेश सुरु झाले असून, त्यासाठी २८ जानेवारी २०१६ पूर्वी आपले अर्ज सादर करावे लागतील. या शिक्षणक्रमांमधून अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र व अद्यापन पद्धती पूर्वप्राथमिक शिक्षण, शैक्षणिक संस्था, नेतृत्व आणि व्यवस्थापन, आरोग्य आणि समतोल आहार, कायदा आणि राज्य/प्रशासकीय कारभार, उपजीविका, सार्वजनिक धोरणे, पर्यावरण, चिरंजीवी विकास, यासारख्या अनेक समाजपयोगी विषयांचा विशेष अभ्यास करणे विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे. वर्गातील शिक्षणाबरोबरच देशभर पसरलेल्या विविध समाजघटकांमध्ये जाऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यावर विद्यापीठाने प्राधान्याने भर दिला आहे.

प्रवेशपूर्व लेखी परीक्षा व मुलाखत :- या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याकरिता विद्यापीठाच्या वतीने रविवार, १४ फेब्रुवारी २०१६ रोजी देशभरातील पस्तीसहून अधिक केंद्रामधून प्रवेशपूर्व लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधर असलेल्या आणि यावर्षी कोणत्याही पदवी- परीक्षेच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील अर्ज करता येणार आहे.

उरणमधील शेतकऱ्यांना ऑनलाइन सातबारा उतारा

। उरण । प्रतिनिधी ।

मिळणार, मिळणार म्हणून शेतकरी ज्याची वाट पाहात होते तो सातबाराचा उतारा सोमवारपासून ऑनलाइन मिळणार आहे. यामुळे शेतकरी व त्यांच्या वारसांचे तलाठी कार्यालयातील हेलपाटे कमी होणार असून शेतकऱ्यांना घरबसल्या हा उतारा मिळू शकेल. सातबाराच्या एका उतारासाठी तलाठी कार्यालयात अनेक फेऱ्या माराव्या लागत असल्याने शेतकरी व त्यांचे वारस त्रस्त झाले आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून सातबारा उताऱ्यांचे सुरू असलेले संगणकीकरणाचे काम पूर्ण झाल्याने शेतकऱ्यांना ही सुविधा मिळणार असल्याचे तहसील कार्यालयातून सांगण्यात आले. शेतकऱ्यांना अनेक कारणांसाठी लागणारा सातबाराचा उतारा मिळविण्यासाठी तलाठ्याचा शोध घ्यावा लागत होता. आजपर्यंत कोणत्याही शेतकऱ्याला एका फेरीत सातबाराचा उतारा मिळालेला नाही. तसेच वर्षानुवर्षांची कागदपत्रे घेऊन तलाठ्यांनाही फिरावे लागत होते.